# UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal : | Research Journey |
| ISSN Number : | |
| e-ISSN Number : | 23487143 |
| Source: | UNIV |
| Subject: | Marathi |
| Publisher: | Swatidhan International Publication |
| Country of Publication: | India |
| Broad Subject Category: | Multidisciplinary |

Print

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

(https://www.ugc.ac.in/) FAQ (https://www.ugc.ac.in/faq.aspx)
RTI (https://www.ugc.ac.in/subpage/RTI-Act.aspx)
Tenders (https://www.ugc.ac.in/Tenders.aspx)
Jobs (https://www.ugc.ac.in/ugc_jobs.aspx)
Press Release (https://www.ugc.ac.in/ugc_pressrelease.aspx)
Contact Us (https://www.ugc.ac.in/contact.aspx) अ (https://www.ugc.ac.in/hindi/)

# UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for r

**Total Journals : 1436**

Show 25 entries Search: Research journey

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=) | 1168 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=) | 1220 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

## For UGC Officials

> e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)

> NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)

> RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)

> PG portal (https://pgportal.gov.in)

KVN Naik Arts, Commerce & Science College IQAC OFFICE

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 22 : Language, Literature & Media December 2017
UGC Approved No. 40107 & 44117

# इलेक्ट्रॉनिक्स शोध व भाषा अध्यापन

**डॉ. पौर्णिमा बोडके.**
**मराठी विभाग,**
**के.व्हि. एन नाईक महाविद्यालय,**
**नाशिक**

**प्रास्ताविक :**

संस्कृती ही भौगोलिक पर्यावरणानुसार व इतिहास क्रमातुन काही श्रदधा-मुल्यानुसार विकसित होते. श्रदधा बदलली की संस्कृती बदलते.21 व्या शतकातील समाजाची मार्गदर्शक तत्वे माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर बदलली असुन आज इलेक्ट्रॉनिक्स ची संस्कृती प्रचलित झालेली आहे. तंत्रज्ञान व यंत्राच्या सहाय्याने मानवी समाजात क्रांतीकारक बदल होत आहे.त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात विज्ञानाच्या विषेशतः इलेक्ट्रॉनिक्स मधील शोध -संशोधनाने मानवी सुखसोयी बरोबर उत्पादन प्रकिया व साधनांच्या सुधारित स्वरुपांमुळे अविश्वसनीय बदल व सुधारणा झालेली आपणास दिसते. थोडक्यात आजची दृकश्राव्य साधनांबरोबर इलेक्ट्रॉनिक्स वस्तु किंवा माध्यमांच्या सान्निध्यातुन साकारणारी विद्यमान संस्कृती ही माहिती तंत्रज्ञानाधिष्ठीत संप्रेषणाची आहे. त्यामुळे भाषा व साहित्य अध्ययन व अध्यापन प्रक्रियेमधील बदल व सुधारणा करण्यासाठी देखील नवनविन माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर करणे क्रमप्राप्तच आहे. प्रत्येक समाजाची प्राथमिक भाषा ही त्या समाजाची संस्कृती संवर्धनाची व गतिमान ठेवण्याची भाषा असते. बदलत्या समाजाच्या बदलत्या श्रदधा बदलत्या व्यवस्थेचे अमूर्त स्वरुप ठरते.मराठी भाषा महाराष्ट्राच्या उत्क्रांत होत गेलेल्या आजच्या आधुनिक मराठी समाजाला सर्मपक व व्यवहारार्य राहण्यासाठी आपणाला अद्यावत असणे आवश्यक आहे.

**विद्यमान संस्कृती - बहुमाध्यमीय**

माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे प्रत्येक क्षेत्रात अनेकविध माध्यमांचा उपयोग केला जात आहे. कॅमेऱ्याच्या शोधानंतर आता इंटरनेट, टेलिव्हिजन, मोबाईल इ. माध्यमांच्या अत्याधुनिक मल्टिमिडिया, स्मार्टफोन, ॲप्स अशा बहुमाध्यमांच्या द्वारे दृश्य संस्कृती उदयाला आलेली आहे. मानवी जीवनात दृश्य संप्रेषणाची अविभाज्यता सहज लक्षात येते.प्रत्येक व्यक्ती या माध्यमातुन विविध क्षेत्रातल्या नवविध दृश्य संस्कृतीचे दर्शन घडविणा-या प्रतिमांच्या गर्दीमध्ये हरवला जातोय.त्या माध्यमातुन साकारणा-या प्रत्येक दृश्य स्वरुपाचे सार्थ ग्रहण करणे मानवी मेंदुच्या आवाक्याबाहेरचे झाले आहे असे दिसतय.यासाठी अध्ययन व अध्यापन पदधतीमध्ये किंवा प्रक्रियेत अशीच दृश्य संस्कृती किंवा दृश्यसंप्रेषणाचा वापर केल्यास विद्यार्थी किंवा अभ्यासार्थी व्यवस्थेतील सार्थग्रहणाची सवय अंगी बाळगण्याकडे आकर्षिला जाण्यास मदत होईल आ जे शिकणे आवश्यक आहे त्या बददल विचारांना किंवा कल्पना शक्तीला वाट करुन देण्याची गरज आहे.म्हणुनच मराठी अध्यापनात आणी व्यवहारात वापर करण्यासाठी आजच्या बहुमाध्यमीय संस्कृतीचा भाग ठेवणे अत्यावश्यक आहे.

मराठी भाषा डिजीटलायझेशन

आजच्या प्रसारमाध्यमांतुन भाषेचा विचार करण्यासची हीच वेळ आहे.परंपरागत आकलन वा आत्मसात करण्याची प्रक्रिया आता बदललीच आहे. एकेकाळाच्या शाब्दीक किंवा भाषिक व्यवहाराची जागा अलिकडे दृश्य किंवा प्रतिमांच्या संप्रषणाने म्हणजेच Visual Communication ने घेतली आहे. सर्व प्रसार माध्यमे आता भाषिक व्यवहारांबरोबर दृश्य स्वरुपात, ध्वनी किंवा डिजीटल हालचालींसह चल स्वरुपात साकारली जात आहेत. पुर्वीचे वर्तमानपत्रे आता केवळ छापली जात नाहीत तर ती इंटरनेट कॉम्युटर च्या सहाय्याने सॉप्टवेअर मार्फत ऑनलाईन,

इ-न्युजपेपर्स, इ -जर्नल्स, इ-बुक इ.रुपाने आपल्यासमोर येतात.त्यात भाषिक वर्णने किंवा सौंदर्यपिक्षा प्रत्यक्ष फोटोग्रफस,व्हिडियो किंवा स्ट्रिप्स च्या माध्यमातुन सादर करुन वाचकांची जागा प्रेक्षकाने घेतली आहे. हे सध्याचे वास्तव चित्र आहे.मग भाषा अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत या सर्व साधनांचा वापर करुन दृश्य स्वरुपातुन भाषिक कौशल्यांचा विकास करणे हाच उद्देश महत्वाचा ठरणार आहे; नव्हे भाषा व दृश्य संस्कृतीचा मेळ घालण्याचे शिक्षण देणे आवश्यक वाटते.स्वाध्याय किंवा गृहपाठ - उजळणीसाठी विद्यार्थ्यांना 'भाषिक उता-यावरुन त्याचे दृश्य स्वरुपात डिजिटलाइज्ड रुप दाखवा; अथवा एखादया दृश्याचे वर्णन आपल्या भाषेत करा' असे प्रश्न जास्त उपयुक्त ठरावेत.

**बहुमाध्यमांचा परिचय**

आजच्या काळात केवळ नैसर्गिक पर्यावरण किंवा मानव निर्मीत भौगोलिक दृश्य परिस्थिती विचारात घेवुन चालणार नाही, तर विज्ञान तंत्रज्ञानाने प्राप्त झालेली इंटरनेट संगणकाच्या किंवा डिजिटल मल्टिमीडियाच्या सर्व साधनांतुन प्रकट होणारे विश्व हे सर्व विद्याशाखांच्या माहितीज्ञान आकलनाच्या प्रक्रियेत महत्वाचे आहे. त्यासाठी कोणते ही ज्ञान क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी प्राप्त परिस्थितीत उपलब्ध अनेकविध प्रसार माध्यमे किंवा माहिती ज्ञान देणारी साधने आपल्याला परिचित असायला हवी; त्याचा भाषा आकलन व वापर करण्यासाठी किंवा त्या माध्यमात भाषेचा वापरकरता येण्याची कैशल्ये आत्मसात करणे हे शिक्षणाचे अंतिम धेय आहे असे स्पष्ट दिसते. काही महत्वाची माध्यमे रेडिओ,दुरदर्शन,फोटोग्राफी, चलचित्रे किंवा सिनेमा, मोबाईल,टॅब - लॅपटॉप , व्हॉट्सअॅप्स, किंवा इतर सोशल मिडिया इ. च्या वापराने अध्ययन - अध्यापनाचे स्वरुपच बदलले आहे.यासर्व आधुनिक माध्यमांचा परिचय अध्यापकांना-विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. थोडक्यात माध्यम साक्षरता (MediaLiteracy) अजमावणे गरजेचे आहे.

मल्टिमिडियाबददल बोलायचे झाल्यास आपणास एक संकरित अनुभव व्यक्त करावासा वाटतो .आज संहिता किंवा Text, ग्राफिक, डिझाइन्स,फोटोज,व्हिडिओज,संगित किंवा ध्वनी इ.चे व्यामिश्र स्वरुप बघतो.त्यामुळे भाषेच्या अध्ययनात यासर्व माध्यमांचा किंवा ऑल इन वन संरचनेचा उपयोग फारच होत आहे. अर्थातच या सगळया माध्यमांचा दृश्य प्रतिमांवर जास्त भर असल्यामुळे भाषिक कौशल्ये व क्षमता यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. म्हणुन नैसर्गिक किंवा पारंपारिक पध्दतीच्या प्रभावी वापरासाठी ही दृकश्राव्य साधनांचा निकोप वापर होणे जास्त महत्वाचे आहे.

**माध्यमांच्या वापराची कौशल्ये**

दृक -श्राव्य माध्यमांच्या वापरासाठी अनेक यंत्र- तंत्राचा आधार घ्यावा लागतो.त्यासाठी संहिता लेखन करुन पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन (PPTs )केले जाते.अशा वेळी यंत्राचे सामर्थ्य वा उणिवा जाणुन घेणे आवश्यक असते.त्यात कॅमेरा किंवा शुटिंग आणि ध्वनिमुद्रण यंत्रणा यांचा स्वरमेळ जुळवावा लागतो.कॅमेरा वापरायचे तंत्र किंवा माहिती शिकुन घेणे क्रमप्राप्त असते.फोटोग्रफी किंवा सिनेमॅटोग्रफी चे तंत्र कौशल्ये आत्मसात असल्यास योग्य व नेमक्या गोष्टी हुबेहुब सादर करणे जमते.केलेल्या शुटिंगच्या जोडीला लिहीलेली संहिता ध्वनी रुपाने मिळती जुळती असावी लागते; हे सर्व आज आयत्याने उपलब्ध असले तरी त्याचा उपयोग सर्व ठिकाणी परिणामकारक असेलच असे नाही.प्राप्त परिस्थितीत या पैकी जी माध्यमे आपण वापरु शकतो त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.स्वतःच्या परिस्थितीत स्वतः कार्यक्रम तयार करुन भाषा संदेशनाचे कार्य या माध्यमातुन पार पाडता येते.

**समारोप**

आजच्या इलेक्ट्रॉनिक्सच्या प्रगत संशोधनाने दृकश्राव्य माध्यमांच्या विकासात मोलाची भर पडलेली आहे. केवळ भाषा अध्ययन - अध्यापनातच या बहुमाध्यमांचा उपयोग नाही तर या माध्यमांच्या आधारे जीवन

व्यवहारांच्या अनेक पध्दती किंवा कार्यप्रणाली बदलेल्या आहे. त्यात कौशल्ये धारण केलेल्या व्यक्तींना शिक्षणानंतर आपल्या व्यवसायाची निवड करुन शिक्षणाच्या फायद्याची प्रचिती येते. भाषा हे संदेशनाचे माध्यम असून अनेक माध्यमातून मानवी भाव -भावना इतरांपर्यत पोहोचविणे शक्य होते 21 व्या शतकात माध्यमांचा चिकित्सक अभ्यास व माध्यमांद्वारे सादरीकरण करण्याचे कौशल्ये प्रत्येक व्यक्तीला असल्यास हवे.

**संदर्भ -**

1. धारुरकर, वि.ल., माध्यम समीक्षा परिमल प्रकाशन औरंगाबाद
2. पांढरे महावीर, 'अभ्यासाची नवी पध्दत' स्नेहवर्धन, पुणे
3. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 'दृकश्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्य '